# कॉक्सिटमध्ये ‘कानमंत्र आई-बाबासाठी’
## मुलांना स्वतःचे मत बनवायला शिकवा - श्री. मनोज अंबिके

लातूर : येथील अंबाजोगाई रोडवरील कॉक्सिट कॅम्पसमधील शारदा इंटरनॅशनल प्रायमरी स्कूलद्वारा आयोजित ‘कानमंत्र आई-बाबासाठी’ या कार्यक्रमात बोलत असताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध व्याख्याते श्री. मनोज अंबिके यांनी मुलांचे संगोपन करत असताना आई बाबांना महत्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यामुळे त्यात चुकूनही चुका होऊ नयेत यासाठी कानमंत्र दिला व कांही महत्वाच्या जबाबदाऱ्यांची जाणीव करुन दिली.

श्री. अंबिके यांनी अनुवंशीकता महत्वाची की संस्कार?, पालकांच्या विविध प्रवृत्ती व त्यातील उणीवा, मुलांना कशा पद्धतीने आचरण करायला लावावे, त्यांच्या विचार करण्याच्या प्रक्रियेत कसा बदल घडवावा? त्यांच्या कोणत्या बाबी वरुन काय प्रतीक्रिया द्याव्यात तसेच पालक म्हणून आपण त्यांना कशा प्रकारे वागणूक द्यावी या व अशाच आपल्या पाल्यांच्या संगोपनातील विविध प्रकारच्या प्रश्नांचा उलघडा करत अत्यंत मनोरंजक पद्धतीने आपले विचार मांडले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. आर. पाटील यांनीही या विषयाचे गांभीर्य सर्व पालकांनी बाळगणे  गरजेचे आहे असे सांगितले. यावेळी कॉक्सिटचे उपप्राचार्य डॉ. बी.एल. गायकवाड, प्रा. टी.एस. गायकवाड, प्रा. एन. एस. झुल्पे, सर्व प्राध्यापक वर्ग व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(डॉ. एम. आर. पाटील)
प्राचार्य